प्रेसनोट दि.२५/११/२०१७

दिनांक १४ नोव्हेंबर रोजी श्री. सदानंद निकम हे त्यांच्या घरी परतत असताना सावंतवाडी येथील चौकामध्ये दोन इसम त्याना भेटले ,त्यांनी त्यांना थांबवुन आपण पोलीस असल्याचे सांगीतले व आमचे साहेब पुढे थांबलेले आहेत, चेकींग चालु आहे ,दागीने घालुन तुम्हाला जाता येणार नाही. मग श्री. निकम यांनी त्यांना सांगीतले मी साहेबांना जाऊन भेटतो असे सांगीतल्यावर साहेब आमचे तुम्हाला दंड करतील असे सांगुन त्याना बेमालूमपणे बतावणी करुन त्यांना त्यांच्या हातातील अंगठया, गळयातील चैन इ. दागीने काढून एका वर्तमानपत्रात बांधुन ती पुढी त्यांच्या खिशात ठेऊन त्यांना त्यानंतर घरी जाण्यास सांगीतले. घरी जाऊन श्री. निकम यांनी पाहीले असता त्यांना वर्तमान पत्राच्या पुढीमध्ये दगड असल्याचे दिसुन आले. याचा अर्थ दागीने काढून खिशात ठेवण्याचे नाटक करीत असताना त्यांनी ती पुढी बेमालूमपणे बदलुन सदरचे दागीने लुटून तेथून पोबारा केल्याचे निष्पन्न झाले होते. त्यावरुन सावंतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. २३०/२०१७ भा.द.वि.क ४१९,४२० प्रमाणे दाखल करण्यात आलेला होता. मा. पोलीस अधीक्षक श्री. दिक्षीत कुमार गेडाम यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विश्वजीत काइंगडे यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले होते. त्यावरुन श्री. काइंगडे यांनी माहीती घेतली असता सदर गुन्हयाच्या प्रकाराबाबत विश्लेषण केले असता सदरचा गुन्हा हा जयसींगपुर येथील हैदर सरताज अली व आंबीवली येथील १ इसम अशा दोघांनी मिळुन केला असल्याचे लक्षात आले. त्यानंतर पोउनि श्री. शाहु देसाई , पाहेकॉ /सुधिर सावंत,आशिष गंगावणे,पोना/ अनुप खंडे, पोना/संतोष सावंत इत्यादींचे पथकाने यातील आरोपी हैदर सरताज अली याचे विषयी माहीती काढून आज रोजी आजरा - आंबोली रस्त्यावर त्यांना ताब्यात घेतले .पोहेकॉ खांदारे पोना/मनोज राऊत, पोना/ अनिल धुरी, पोकॉ/ज्ञानेश्वर कंदळगावकर यांनी त्यांच्याकडे कौशल्यानं चौकशी करुन सदरचा गुन्हा हैदर अली यांने केल्याचे कबुल केले असुन त्याने आंबवली येथील आपले साथीदाराचे नावही पोलीसांना सांगितले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास चालु असताना या गुन्हेगारांनी उल्हासनगर येथे महीलां रत्यावरुन जात

असताना मोटारसायकल वरून येऊन सोनसाखळी खेचुन पोबारा केल्याचे ८ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. कणकवली, कुडाळ व गोवा राज्यातही त्यांनी अनेक गुन्हे केल्याची प्राथमिक माहीती मिळत आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक त्यांच्याकडे विचारपुस करत आहे. सदर आरोपींना सावंतवाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.२३०/२०१७ मध्ये अटक करण्यात आलेली आहे. उदईक त्यांना सावंतवाडी न्यायालयात हजर केले असता त्याला २६/११/२०१७ ते दि. २९/११/२०१७ पर्यंत पोलीस कस्टडी मिळाली आहे.

तसेच कुडाळ पोलीस ठाणे हद्दीतील राहणारे नारायण विष्णु जावकर रा. बाव नाईकवाडी ता. कुडाळ व कणकवली पोलीस ठाणे येथील श्रीमती वंदना दिनकर मुसळे रा. बिजलीनगर कणकवली यांना काही दिवसापुर्वी सदर इसमाना आपण पोलीस असल्याचे भासवुन लुटमार केलेली होती. सदर व्यक्तिना सदर आरोपीत याचे छायाचित्र दाखवीले असता सदर इसमांनी त्याला ओळखलेले आहे. तसेच तेलंगणा मधील इन्स्पेक्टर श्री. चैतन्य, सायबर क्राईम ब्रँच हे सावंतवाडी पोलीस ठाणे येथे हजर झालेले आहेत. सदरच्या कारवईबाबत मा.पोलीस अधीक्षक, श्री. दिक्षितकुमार गेडाम यांनी समाधान व्यक्त केले असुन या कारवाई करणा-या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या अधिकारी व कर्मचारी यांना लवकरच बक्षीस दिले जाणर असल्याचे घोषीत केले आहे.